6 JUN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात पर्यावरणदिनानिमित्त वृक्षारोपण

कोल्हापूर : प्रतिनिधी

जागतिक पर्यावरणदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ परिसरात मंगळवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे काही सेवाभावी संस्थांतर्फे विद्यापीठास विविध प्रकारची रोपेही भेट देण्यात आली.

मंगळवारी सकाळी दूरशिक्षण विभागाच्या परिसरात कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी.डी. राऊत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, उद्यान विभागाचे अधीक्षक ए.के. जाधव यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी लहान मुलांची उत्स्फूर्त उपस्थिती दिसून आली. या सर्वांना सोबत घेऊनच कुलगुरूंनी वृक्षारोपण केले.

कोल्हापूर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ परिसरात मंगळवारी वृक्षारोपण करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

दरम्यान, विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या परिसरात कोल्हापूर वन विभागाच्या सहकार्याने शंभर रोपे लावण्यात आली. यावेळी उप-वनसंरक्षक सोनल कोंडुसकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच वन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

कडुलिंब ऑक्सिजन पार्क

या उपक्रमात देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस अँड सायन्स कॉलेज, यशवंतनगर (चिखली), राजाराम बापू शुगर टेक्नॉलॉजी कॉलेज, इस्लामपूर, लायन्स क्लब ऑफ कोल्हापूर आणि इस्लामपूर तसेच इफको कंपनी यांच्याकडून शिवाजी विद्यापीठास कडुलिंबाची १०० रोपे देण्यात आली. प्राचार्य डॉ.एस.आर.पाटील यांच्यासह बाबासाहेब पवार, उमेश पवार, व्ही. आर. कलेडोणकर आदींनी कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांच्याकडे ही रोपे सुपूर्द केली. शिवाजी विद्यापीठात पर्यावरणपूरक कडुलिंबाचा इको-झोन ऑक्सिजन पार्क निर्माण करण्याच्या दृष्टीने नजीकच्या काळात याच संस्थांकडून विद्यापीठास कडुलिंबाची दहा हजार रोपे लागवडीसाठी देण्याचा मानस असल्याचेही यावेळी प्राचार्य डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. त्यामुळे लवकरच विद्यापीठात कडुलिंग ऑक्सीजन पार्क साकारणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 JUN 2018 पुण्यनगरी

शिवाजी विद्यापीठ करणार भुयारी मार्ग

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊन शिवाजी विद्यापीठाने भुयारी मार्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रंथालय ते शाहू संशोधन केंद्र, असा भुयारी मार्ग करणार असून, याबाबतचा अंदाजे ८ कोटींचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला आहे. या भुयारी मार्गामुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षित रस्ता मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर एकूण ८५३ एकराचा आहे; मात्र या परिसरातूनच जुना पुणे-बेंगलोर हायवे गेल्याने पूर्व आणि पश्चिम या भागात विभागला आहे. पश्चिम भागात मुख्य इमारतीसह विविध अभ्यासक्रमांचे विभाग आहेत, तर पूर्व भागात तंत्रज्ञान विभाग, नॅनोटेक्नॉलॉजी, इतिहास विभाग, शाहू संशोधन केंद्र यांच्यासह नव्याने उभारत असलेल्या पत्रकारिता विभागाचा समावेश आहे. यामुळे पश्चिम विभागातून पूर्वेच्या बाजूला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत चालली आहे. यामुळे रोड क्रॉसिंग करताना बऱ्याचदा विद्यार्थ्यांना अपघाताला सामोरे जावे लागते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने पश्चिम भाग ते पूर्व भागाला जोडणारा भुयारी मार्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. पुण्यातील अस्ट्युट कन्सल्टंट या कंपनीने आराखडा तयार केला आहे.

सुरक्षित मार्ग तयार होणार

ग्रंथालय चौक ते शाहू शिक्षण केंद्रापर्यंतच्या होणाऱ्या भुयारी मार्गात लाईटची व्यवस्था, पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र पथ आणि वाहनेही जाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना सोयीस्कर आणि सुरक्षित होणार आहे. अंदाजे ८ कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला असून, लवकरच त्याची परवानगी मिळेल आणि कामाला सुरुवात केली जाईल.

- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

6 JUN 2018

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पर्यावरण दिनी कोल्हापुरात उपक्रम आणि आंदोलनही

प्रतिनिधी , कोल्हापूर

जागतिक पर्यावरण दिनी कोल्हापुरात पर्यावरण रक्षण आणि पर्यावरण घातक अशा दोन्ही मुद्यांवरून उपक्रम , आंदोलन करण्यात आले . शिवसेनेने पंचगंगा नदी प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्या घटकांवर कारवाई न करणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना मृत मासे, जलपर्णी आणि दूषित पाणी यांची भेट दिली .

पंचगंगा नदी प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्या घटकांवर कारवाई न केल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळ टीकेचा विषय बनले आहे. आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयापासून शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत एका ढकल गाडीवर मृत मासे, जलपर्णी आणि दूषित पाणी घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढला . जिल्हा प्रमुख संजय पवार यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना हा सारा ऐवज भेट दिला. शिवसैनिकांची ही भेट स्वीकारण्यास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी नकार दिल्याने कार्यालयाच्या दारात त्यांनी भेटवस्तू ठेवत पूजन केले.

पर्यावरण संवर्धन जागर

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका व पर्यावरण प्रेंमीच्या सहभागाने शहरात आज पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्यात आला. विद्यार्थी स्केटींग रॅली, पर्यावरण संवर्धनाची शपथ, रिक्षा व केएमटी बसेसवर जनजागृती पोस्टर्स, वृक्ष लागवड आदी उपक्रम राबविण्यात आले.

प्रजासत्ताक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई, निसर्ग मित्रचे अनिल चौगुले, महापालिका पर्यावरण अभियंता आर. के. पाटील, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे समीर वायगम्बरे आदींच्या सहभागाने विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातून निघालेल्या स्केटींग रॅलीमध्ये 'प्लॅस्टिक टाळा देश वाचवा' हा संदेश देण्यात आला. केएमटी बसेस व शहरातील रिक्षांवर प्लॅस्टिक वापराबाबत जनजागृती करणारे पोस्टर्स चिकटविण्यात आले. जयंती नाला परिसर, प्रिन्स शिवाजी गार्डन, कसबा बावडा जयंती नाला पूल याठिकाणी फणस, बाभुळ, करंजी आदी झाडांची रोपे लावली.

शिवाजी विद्यापीठात ऑक्सिजन पार्क

शिवाजी विद्यापीठ परिसरात आज कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विविध शिक्षण संस्थांकडून शिवाजी विद्यापीठास कडुलिंबाची १०० रोपे प्रदान करण्यात आली. विद्यापीठात पर्यावरणपूरक कडुलिंबाचा इको-झोन ऑक्सिजन पार्क निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठास कडुलिंबाची दहा हजार रोपे लागवडीसाठी देण्याचा मानस असल्याचे या वेळी प्राचार्य डॉ.एस.आर.पाटील यांनी या वेळी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 JUN 2018 महाराष्ट्र टाईम्स

'पर्यावरण रक्षणासाठी खारफुटी वनस्पती महत्त्वाची'

महाराष्ट्र उद्यानात वृक्षारोपण

कोल्हापूर टाइम्स टीम

'पर्यावरण रक्षणासाठी खारफुटी वनस्पती महत्त्वाची असते,' असे मत वनस्पती शास्त्राच्या अभ्यासक डॉ. निरंजना चव्हाण यांनी व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र टाइम्स, गार्डन्स क्लब व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ताराबाई पार्क येथील महाराष्ट्र उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. सभागृह नेता दिलीप पोवार, गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा डॉ. धनश्री पाटील, गार्डन्स क्लबचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.

शहरातील उद्यानांना नवे रुप देण्यासाठी महाराष्ट्र टाइम्स व गार्डन्स क्लबने एकत्र येत या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली आहे. शहरातील उद्यानांची दुरवस्था झाली असून लोकसहभागातून उद्यानांचा विकास करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवला जात आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ताराबाई पार्कमधील 'महाराष्ट्र उद्यान' निवडण्यात आले आहे. या उद्यानामधील मोठी जागा वापराविना पडून होती. परिणामी तिथे झुडपांचे साम्राज्य पसरले होते. महापालिकेने जागेचे सपाटीकरण केले आहे.

शशिकांत दोषी, नीता शिंदे, जयश्री कजारिया, कल्पना सावंत, कृपेश हिरेमठ, सुजाता लोहिया, संगीता कोकितकर, शैला निकम, तेजस्विनी पाटील, डॉ. पद्मश्री आवटे, डॉ. स्मिता गिरी, डॉ. अल्पना चौगुले, वर्षा वायचळ, दीप्ती सोहनी, प्रेम लाड, दर्शील सापळे, शाश्वत पाटील, करण मोकाडिया आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स, गार्डन्स क्लब व महापालिकेच्यावतीने महाराष्ट्र उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले त्याप्रसंगी उपस्थित गार्डन्स क्लबचे सदस्य व नागरिक.

ग्रीन कोल्हापूर

"खारफुटी वनस्पती अतिशय महत्वपूर्ण असून कमी क्षार असलेल्या ठिकाणी ती चांगल्याप्रकारे वाढते. या वनस्पतीचे संवर्धन होण्यासाठी कोल्हापुरातील उद्यानात रोपे लावली जात आहेत. तटरक्षक म्हणून या वनस्पतीची ख्याती आहे. गेल्या ४५ वर्षांपासून संशोधन सुरू आहे.

– प्रा. डॉ. निरंजना चव्हाण
वनस्पतीशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 JUN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठाला पाच वर्षांत मिळाले फक्त ३ कोटी ९० लाख

कुर्मगतीने निधी; ५० कोटी रु. देण्याची केली होती घोषणा, नियोजन खोळंबले

कोल्हापूर : विजय पाटील

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य सरकारच्या वतीने ५० कोटी रुपये विद्यापीठास देण्याची घोषणा केली. आता या घोषणेला पाच वर्षे होत आली. पन्नास कोटी रुपयांपैकी आतापर्यंत फक्त ३ कोटी ९० लाख रुपयेच विद्यापीठाच्या पदरात पडले आहेत. पन्नास कोटी रुपये मिळतील, या अपेक्षेने प्रशासनानेही विविध शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन केले होते; पण कासवगतीने पैसे दिले जात असल्याने आता हे नियोजनच खोळंबले असल्याचे स्पष्ट आहे.

शिवाजी विद्यापीठातून...

शिवाजी विद्यापीठाचा २०१२-१३ साली सुवर्ण महोत्सव साजरा झाला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवाच्या कार्यक्रमात तत्कालीन उपमुख्यमंत्री पवार यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासासाठी पन्नास कोटी रुपये देण्याची घोषणा केली.

या घोषणेच्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात २ कोटी ४० लाख रुपये विद्यापीठाला देण्यात आले. दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१३-१४ साली पुन्हा ४० लाख रुपये देण्यात आले. यानंतर राज्य सरकार बदलले. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने उर्वरित निधीची रितसर मागणी केली. यानंतर १६-१७ साली ७५ लाख रुपये विद्यापीठाला मिळाले. पुन्हा १७-१८ सालीही ३५ लाख रुपये मिळाले. आतापर्यंत एकूण ३ कोटी ९० लाख रुपये विद्यापीठाला मिळाले आहेत.

राज्य सरकारकडून घोषणा ५० कोटी रुपयांची करण्यात आली. आता प्रत्यक्षात पाच टक्के रक्कमही पाच वर्षांत विद्यापीठाला मिळालेली नाही. नियोजित निधी संथगतीने दिला जात असल्याने याबाबतच्या नियोजनाचा बोजवारा उडाला आहे. ग्रामीण परिसराचे नेतृत्व करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाला घोषणेप्रमाणे निधी मिळाला असता, तर किमान विद्यार्थ्यांसाठी कल्पक उपक्रम राबवण्यास हातभार लागला असता. त्यामुळे किमान आता तरी उर्वरित निधी वेगाने मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सातत्याने पाठपुरावा : कुलगुरू

आम्ही सातत्याने हा निधी मिळावा, यासाठी पाठपुरावा करत आहोत. आतापर्यंत एकूण निधीपैकी मिळालेला निधी अपुरा वाटावा, असा आहे. त्यामुळे यापुढील काळात नियोजित निधी भरीवरीतीने मिळाला, तर अनेक शैक्षणिक उपक्रमांना चालना देणे सोयीचे होईल, असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 JUN 2018 सकाळ

संशोधनाला पुरस्काराचे कोंदण

वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांना सर्वोच्च सन्मान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : वनस्पतींच्या संशोधनासाठी त्यांनी आयुष्य वेचलं, वनस्पतींच्या सहवासात ते तहानभूक हरपले. वनस्पतींच्या ७० नव्या प्रजातींचा शोध लावला. त्यावर झपाटल्यासारखे लेखन केले, शोध निबंध सादर केले आणि रानावनांतून दडलेला खजिना अभ्यासकांसह सर्वसामान्यांसाठीही खुला केला.

डॉ. श्रीरंग यादव यांनी कोल्हापूरचा ठसा जगभर उमटवला. वनस्पतीशास्त्र विषयात ३० वर्षे राष्ट्रीय पातळीवर संशोधन मांडणाऱ्या डॉ. यादव यांना केंद्रीय पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने आज 'इ. के. जानकी अम्मल जीवन गौरव' पुरस्कार देऊन गौरवले. संशोधन क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे डॉ. यादव हे महाराष्ट्रातील एकमेव संशोधक ठरले. या पुरस्काराने कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठाचाही गौरव झाला.

नवी दिल्ली : संशोधक डॉ. श्रीरंग यादव यांचा मंगळवारी इ. के. जानकी अम्मल जीवन गौरव पुरस्काराने गौरव करताना केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन.

> शिवाजी विद्यापीठामध्ये विकसित केलेल्या 'स्कूल ऑफ टेक्सॉनॉमी'साठी हा पुरस्कार मला प्राप्त झाला आहे. यामध्ये माझ्यासोबतच विद्यार्थ्यांनीही संशोधन केले आहे. त्यामुळे या पुरस्कारामध्ये विद्यार्थ्यांचाही वाटा तितकाच मोठा आहे. शिक्षक हा त्यांच्या विद्यार्थ्यांमुळे मोठा होतो.
> – डॉ. श्रीरंग यादव,
> ज्येष्ठ वनस्पती संशोधक

शेतकरी कुटुंबात जन्मलेले प्रा. डॉ. यादव यांनी १९८५ मध्ये

पान ८ वर »

संशोधनाला पुरस्काराचे कोंदण

» पान १ वरून

शिवाजी विद्यापीठात अध्यापनाला सुरुवात केली. वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून ते २०१४ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. वनस्पती वर्गीकरण शास्त्रातील संशोधनाने त्यांनी विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त करून दिली. डॉ. यादव व डॉ. मिलिंद सरदेसाई यांनी लिहिलेल्या 'फ्लोरा ऑफ कोल्हापूर डिस्ट्रिक्ट'मध्ये २ हजार ३६० हून अधिक प्रजातींची नोंद एकट्या कोल्हापूर जिल्ह्यातून केली. आजही इतक्या मोठ्या प्रमाणावर नोंद असणारा हा एकमेव वनस्पतिकोष आहे. महाराष्ट्रातील गवतांवर लिहिलेले त्यांचे पुस्तकही प्रसिद्ध आहेत. विद्यापीठातील 'लीड बॉटनिकल गार्डन' ही पश्चिम भारतातील एकमेव बाग आहे.

डॉ. यादव यांचे योगदान

- वनस्पतींच्या ७० शोधल्या प्रजाती
- ब्राचीस्टेल्मा श्रीरंगी, उलालीया श्रीरंगी, इस्चिमम यादवी, विग्ना यादवी या संशोधनाला डॉ. यादव यांचे नाव
- नामांकित संस्थांचे प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त
- २५० शोधनिबंधांचे देश, विदेशात सादरीकरण

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

डॉ. एस. आर. यादव यांना जीवनगौरव पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम



शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. एस. आर. यादव यांना भारत सरकारच्या पर्यावरण वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयाचा 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला डॉ. यादव यांना केंद्रीय मंत्री हर्षवर्धन यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराने गौरवण्यात आलेले डॉ. यादव हे महाराष्ट्रातील एकमेव प्राध्यापक आहेत.

डॉ. यादव यांचे मूळ गाव कराड तालुक्यातील साईकडे असून ते शेतकरी कुटुंबातील आहेत. शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्र विभागातून २०१४ साली निवृत्त झाले असले तरी केंद्र सरकारच्या मूलभूत शास्त्र संशोधन व प्रोफेसर इमेरिटसच्या माध्यमातून ते सध्या कार्यरत आहेत. डॉ. यादव यांनी वनस्पती वर्गीकरण शास्त्रातील संशोधनातून विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवून दिली आहे.

अडीचशेहून अधिक शोधनिबंध, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले असून दहा पुस्तकांचे लेखक आहेत. डॉ. मिलिंद सरदेसाई यांच्यासोबत डॉ. यादव यांनी लिहिलेल्या 'फ्लोरा ऑफ कोल्हापूर डिस्ट्रिक्ट'मध्ये २३६० हून अधिक प्रजातीच्या वनस्पतींची नोंद एकट्या कोल्हापूर जिल्ह्यातून केली. अशी नोंद असलेला हा वनस्पतीकोष एकमेव आहे. डॉ. यादव यांनी नव्या ७० प्रजातीही शोधल्या आहेत. विद्यापीठाला जवळपास ६ कोटी रूपयांचे अनुदान मिळवून दिले आहे.